**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** प्रसाद कृष्णा मेंडके.

**वय** - २४ वर्ष, **व्यवसाय** - चालक,

**राहणार.**- कडगाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्री.एस.बी. कांबळे, सरकारी वकील.**

**१.** मी आरोपीला ओळखतो, तो आमच्या गावात राहतो. मला २०२० साली त्याच्याकडे कोणती गाडी होती ते मला माहित नाही. मला २०२० साली निलेशकडून अपघात झाल्याची माहिती नाही. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला नव्हता.

**साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदारास फितुर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. ०८.०७.२०२० रोजी मी व निलेश त्याची पिकअप गाडी क्र. एम.एच.–०९–ई.एम.–८८७३ ने गोव्याला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, दि.०८.०७.२०२० रोजी आम्ही परत येत असताना आर्दाळ येथे निलेशने बैलगाडीला ओव्हरटेक करताना समोरुन आलेल्या मोटारसायकलला धडक दिली होती.

**३.** हे म्हणणे खरे नाही की, त्या अपघातामध्ये मोटारसायकल वरील सुनिल व निकिता जखमी झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघातास निलेश पुर्णपणे जबाबदार आहे. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित भाग अ वाचून दाखविला. तो मी पोलिसांना सांगितला नव्हता. तो त्यांनी माझ्या जबाबात का लिहिला आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे मित्र असल्यामुळे मी त्याला वाचवण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास – श्रीमती. एम. यू. कानडे वकील.**

**४.** आरोपीच्या वकिलांनी उलट तपास नाकारला.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ०३.०१.२०२५.

(आर. पी. थोरे)

आजरा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** संभाजी तुकाराम शेळके.

**वय** - ६२ वर्ष, **व्यवसाय** - शेती,

**राहणार.-** आर्दाळ, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरतपास– श्री.एस.बी. कांबळे, सरकारी वकील.**

**१.** मला दि.०९.०७.२०२० रोजी पोलिसांनी पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. पोलिसांनी माझ्या पोलिस ठाण्यात बोलावून काही ठिकाणी स्वाक्ष–या घेतल्या होत्या. पोलिसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला नव्हता.

**साक्षीदार सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदारास फितुर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९.०७.२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजण्याच्या सुमारास आर्दाळ गावाच्या हद्दीत पोलिसांनी पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी महिंद्रा पिकअप गाडी क्र. एम.एच.–०९–ई.एम.–८८७३ ने मोटारसायकल क्र. एम.एच.–०९–एफ.एन.–४४९२ ला धडक देऊन अपघात केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी त्याबाबतचा माझ्या समक्ष पंचनामा करुन मला वाचून दाखविला होता. आमच्या गावातील सुहास कृष्णा कांबळे आणि प्रताप विठ्ठल पाटील दोघेही मयत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचवण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास – श्रीमती. एम. यू. कानडे वकील.**

**३.** आरोपीच्या वकिलांनी उलट तपास नाकारला.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ०३.०१.२०२५.
(आर. पी. थोरे)

आजरा.
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.